G. K. GOKHALE COLLEGE KOLHAPUR

# ENERGY CONSEVATION ACTIVITY

College Organized energy conservation programe on 14-12-21 to 16-12-21 in this duration Prof.P.B.Zavre prepared awareness pamphlets of energy conservation and distributed through NCC & NSS students to neiburhood places traffic area and understood to people of importance of energy conservation also display board of energy saving and taken oath all students and faculty participated in this programe

## ऊर्जा संवर्धन सप्ताहाला प्रारंभ

सकाळ वृत्तसेवा



जरगनगर : राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त शपथ घेताना विद्यार्थी, प्राध्यापक आदी.

जरगनगर, ता. १४ : राष्ट्रीय ऊर्जा दिनानिमित्त गोखले महाविद्यालयात राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहास सुरुवात झाली. ऊर्जा संवर्धनाची माहिती आणि महत्त्व सांगणाऱ्या डिजिटल बोर्डचे उद्‌घाटन पेट्रन कौन्सिल मेंबर दौलत देसाई, अजित मोरे यांच्या हस्ते झाले.

सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी ऊर्जा संवर्धनाची शपथ घेतली. या सप्ताहाअंतर्गत उद्या (ता. १५) विद्यार्थ्यांना ऊर्जा संवर्धनाविषयी माहितीपत्रक वाटप, अपारंपरिक ऊर्जेचे महत्त्व सांगितले जाईल. १६ ला महाविद्यालय परिसरात 'ऊर्जा संवर्धन' या विषयाच्या माहिती पत्रकांचे वाटप करण्यात येईल. तसेच घरोघरी जाऊन ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व सांगितले जाईल. १७ तारखेला व्याख्यान होईल. भित्तीपत्रिका उद्‌घाटन करण्यात येईल. १८ ला घोषवाक्य स्पर्धेचे निकाल जाहीर करून समारोप करण्यात येईल. शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा. जयकुमार देसाई, प्रशासन अधिकारी प्रा. डॉ. मंजिरी मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

उपप्राचार्य एस. एच. पिसाळ, प्रा. पी. बी. झावरे, नॅक को-ऑर्डिनेटर डॉ. डी. व्ही. आवळे, प्रा. सुहास घाटगे, प्रा. डॉ. आर. बी. भुयेकर, प्रा. एस. जी. राक्षसे, प्रा. डी. एस. कांबळे, प्रा. डी. के. नरळे, प्रा. पी. पी. सुतार, प्रा. यू. व्ही. मोटे, सुपरवायझर एस. एन. मोरे परिश्रम घेत आहेत.

G. K. GOKHALE COLLEGE
KOLHAPUR






















